**लेख क्र.१**

# गहू रोप-रस चिकित्सा

क्लोरोफिल ट्रिटमेंट म्हणजे वनस्पतीच्या हरित द्रव्यापासून केलेले उपचार, सर्वात जास्त हरित द्रव्य हे गव्हाच्या रोपांच्या रसान असते म्हणून त्याला 'गहू रोप-रस चिकित्सा' असे हि म्हणता येईल.भारतात आता कुठे आयुर्वेदाला चांगले दिवस आले आहेत.निसर्गातच औषधांचा खजिना आहे हे सत्य पाच हजार वर्षापूर्वी सर्वप्रथम आयुर्वेदाने सिध्द केले आहे. सर्वात जास्त क्वोरोफिल गव्हाच्या रोपांच्या रसात असते म्हणून गव्हाच्या रोपाचा रस म्हणजे पृथ्वीवरचे 'अमृत' आहे. कोहळा

गव्हाच्या रोपांच्या रसात सर्व आवश्यक क्षार असतात. याशिवाय कार्बोहायड्रेडस्, प्रोटीन आणि चरबी याचे प्रमाण बरेच असते. जीवनसत्वांचा विचार केला तर जीवनसत्व ए,बी,सी,ई,के,लिस्ट्राईल-बी १७ इत्यादी जीवनसत्वे असतात. लिस्ट्राईल-बी १७ मुळे कॅन्सर समूळ नष्ट होऊ शकतो.तसेच हृदयविकार, एड्स,सोरासिस अशा असंख्य असाध्य रोगविकारांवर गहू रोप रस गुणकारी ठरते. 'क्लोरोफिल' हा रक्तातील हिमोग्लोबीन मधल्या हेमिनचे परमाणू यांत ९९.६ % साम्य असते. त्यामुळे क्लोरोफिल रक्तात चटकन मिसळते आणि रुग्नास चैतन्यशिल उत्साह वाटतो. क्लोरोफिल मधील परमाणूंच्या केंद्रास्थनी 'मॅग्नेशियम' असते तर हेमिनमधील परमाणूंच्या केंद्रस्थनी 'लोह' असते. गव्हांच्या रोपांचा रस हा खालील रोगावर रामबाण उपाय आहे.

१. हृदयाचे रक्ताभिसरण होते.
२. मासीक पाळी न येणे, अनियीमत येणे. मासीक पाळीच्या वेळी गुठळ्या पडणे, कंबर, हात-पाय दुखणे.
३. श्वसन संस्थेचे रोगावर निंयत्रण, दमा, सर्दी-खोकला, टी. बी. इत्यादीवर.
४. पचन संस्थेचे रोगावर म्हणजे आंतड्याची सूज, ॲसिडीटी, मलावरोध, अपचन, घशातील सूज.
५. दात हिरड्यातून रक्त, पू येत असेल तर थांबते. दात किडणे, हलणे अश्या दातांच्या विकारांवर रसाबरोबर गव्हाची रोपे चावून खावीत

६. मेंदू व मज्जातंतूचे विकारावर नियंत्रण म्हणजे शरीराला कंप सूटणे. तोल जाणे.विस्मरण होणे तोतरेपणा अर्धांगवात होणे. हाता-पायांना मुंग्या येणे.

गव्हांच्या रोपांची लागवड करण्याची रीत. एक चौरस फूटाच्या सात कुंड्या असावीत रविवार ते सोमवार सात वारांची नांवे लिहून माती, खत भरून घ्यावे याचे प्रमाणे तिन भाग माती व एक भाग कंपोस्ट खताने भरावे. मातीमध्ये खूप चिकटपणा नसावा. उत्तम प्रतिचे गहू घ्यावेत दाणे मोठी असावीत म्हणजे उगवलेली रोपे उंच  रसदार असतात. १०० ग्रॅम गहू पेरलेनंतर जवळ जवळ ५ ते ६ औंस रस निघतो एका रूग्नाला एवढा रस पुरेसा होतो. पेरण्या पूर्वी चांगला गहू मोड आणण्यासाठी थोडेसे पाणी घेवून गहू प्रथम बारा तास भिजत ठेवावेत. बारा तासानंतर गव्हाचे दाणे चांगले फुगतात हे फुगलेले गहू जाड ओल्या फडक्यात १२ ते १४ तास बांधून ठेवावेत मोड आलेनंतर ते कुंडयातील मातीत पेरणी करावे पेरणी केलेल्या कुंडी प्रत्येक वाराची एकच असावी. पहिल्या दिवशी एक, दुसऱ्या दिवशी एक, असे सात दिवसांचे सात कुंड्या होतात. पहिल्या पेरलेल्या कुंडीला सात दिवस झालेनंतर आठव्या दिवशी कात्रीने कापून त्या रोपापासून रस काढावा व तो ध्यावा. थोडक्यात गहू पेरल्यानंतर आठव्या दिवशी कापून रस काढून मगच घ्यावा. दिवसातून एकदाच पाणी मारावे. या कुंड्यांना २-३ तास ऊन लागते असे ठेवावे. ज्या ठिकाणी गहु उपलब्ध होणेस अडचणी चे असल्यास मक्याचे दाणे ही या कुंड्यांत पेराणी केली तर चालते. पण मक्याच्या रोपापासून क्लोरोफिल कमी मिळते.